# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

प्रेस नोट क्र-३४ दिनांक - ०५/०२/२०२४

## मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयाकडुन क्रिकेट मॅचे चे आयोजन

श्री. मधुकर पाण्डेय. पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे संकल्पनेतून व सूचनांप्रमाणे तसेच श्री. श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली मिरा-भाईदर वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत परिमंडळ- ०१ मधील काशिमिरा, मिरारोड, नयानगर, भाईदर, नवघर व उत्तन पोलीस ठाण्यांचे हद्दीमध्ये एकात्मता व जातीय सलोखा राखून आपले जीवन शांततेने व्यतित करावे, या हेतूने पोलीस आयुक्तालयांतर्गत नेमणुकीस असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार तसेच मिरा-भाईदर परीसरामधील नागरीक यांचेमध्ये आज दि. ०४/०२/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वा. ते ११.५० वा. चे दरम्यान नवघर पोलीस ठाण्याचे हद्दीतील भारतरत्न श्री. सचिन तेंडुलकर मैदान येथे क्रिकेट सामन्याचे आजोजन करण्यात आलेले होते.

सदर क्रिकेट सामन्याचे उद्घाटन मा. पोलीस आयुक्त, सो. श्री. मधुकर पाण्डेय, सो. मि.भा.व.वि. आयुक्तालय यांचे शुभहस्ते करण्यात आलेले असून सदर प्रसंगी . श्री. प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ- ०१ मिरारोड, मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री. उमेश माने-पाटील नवघर विभाग, श्री. विजय मराठे मिरारोड विभाग, श्रीमती दिपाली खन्ना, भाईदर विभाग व परिमंडळ- ०१ अंतर्गत काशिमिरा, मिरारोड, नयानगर, भाईदर, नवघर व उत्तन पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व इतर अधिकारी अंमलदार असे उपस्थित होते.

सदरचा क्रिकेट सामना पाहण्याकरीता नवघर,नयानगर, भाईदर, उत्तन व मिरारोड पोलीस ठाण्यांचे हद्दीमधील सर्व जाती-धर्मातील व समाजातील साधारण १५० ते २०० लोकांचा जन-समुदाय उपस्थित राहीलेला होता. उपस्थित जन-समुदायाशी मा. पोलीस आयुक्त, श्री. मधुकर पांडेय सो. यांनी सु-संवाद साधला.

सदरचा क्रिकेट सामना हा मिरा-भाईदर वसई-विरार आयुक्तालयाचे टिमकडून जिंकण्यात आलेला असून सामना संपल्यानंतर मा. पोलीस आयुक्त, सो. श्री. मधुकर पांडेय मि.भा. व.वि. आयुक्तालय यांचे शुभहस्ते विजेता संघ व उपविजेता सघांना ट्राफी (चषक) तसेच सदर क्रिकेट सामन्यामधील उत्कृष्ट गोलंदाज, फलंदाज व सामनावीर यांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले.



६

